महाराष्ट्र वन विभाग
वन विभाग
दुरध्वनी क्रमांक- (02162) 220057, 220058, 220059
Email - forest.satara68@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय
"वनभवन", गोडोली वन रोपवाटीका परिसर,गोडोली, सातारा 415 001

जा.क्र. - ब/जमीन/20.21/ 3033
सातारा: 415 001 दिनांक 26/02/2021.
01/03

श्री. एन. एस. चव्हाण,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
साईयो इन्फ्रा कोल्हापूर.

विषय - वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत महाप्रताप हवाई रज्जु मार्ग प्रकल्पासाठी (Ropeway) प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ - 1. आपलेकडील दिनांक 29/08/2017 रोजीचे पत्र.
2. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/जमीन/प्र.क्र.1/2261 दिनांक 07/07/2017.
3. वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांचेकडील पत्र क्र.अ/जमीन/1145दि. 18/1/2019
4. आपलेकडील पत्र क्र. Saioinfrastructure/forest proposal/१५/२०१८ दिनांक १९/११/२०१८
5. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/जमीन/4336 दिनांक 06/12/2018.
6.वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांचेकडील पत्र क्र.अ/जमीन/1122दि. 14/1/2019.
7. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/जमीन/6006 दि. 11/3/2019.
8. आपलेकडील पत्र क्र. 12/वन-14/रोपवे दिनांक 28/12/2020.

संदर्भीय पत्र क्र. ८ अन्वये महाबळेश्वर ते प्रतापगड महाप्रताप रोपवेसाठी ३.७८३५ हे. वनक्षेत्र वळतीकरण करणेसाठीचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता काही त्रुटी आढळुण आलेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे आहेत.

१. सदर प्रस्तावास केंद्रस्थ अधिकारी यांनी अद्याप तपासुन स्विकारला नसल्याचे प्रस्तावात जोडलेल्या दिनांक ०७/०२/२०१९ च्या इमेल वरुन स्पष्ट दिसुन येत आहे. यामुळे सदरचा प्रस्ताव या कार्यालयाचे ऑनलाईन डॅशबोर्डवर दिसुन येत नाही.
२. सदर प्रस्ताव या कार्यालयाचे ऑनलाईन डॅशबोर्डवर दिसत नसल्याने या प्रस्तावर संस्करण करता येत नाही. या कारणाने सदर प्रस्ताव आवश्यक पुर्ततेसाठी पतर करणते येत आहे.
३. प्रस्तावामध्ये रोपवे ची लांबी ३.३०७ कि.मी. नमुद करणेत आली असले तरी वेगवेगळया पानांवर वेगवेगळी लांबी नमुद केली आहे. उदा. पा.नं. ४ व ५ वर अनुक्रमे ५.५८९ व ५.८०० कि.मी. लांबी दर्शविली आहे.
४. प्रस्तावातील पार्ट १ मध्ये प्रकल्पासाठी ३४.२९८५ हे. वनेत्तर क्षेत्र लागत असल्याचे नमुद केले आहे. तथापी प्रस्तावाच्या पा.नं. १० वर ३४.१८२ हे वनेत्तर क्षेत्र प्रस्तावित असल्याचे नमुद आहे.
५. प्रस्तावातील पार्ट १ मध्ये गावनिहाय व बाब निहाय दर्शविणेत आलेल्या प्रस्तावित वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्र वेगवेगळे दर्शविले आहे.

६. पार्ट १ मध्ये अनुक्रमांक L - (iv) - (d) मध्ये खासाराच्या तपशिलामध्ये पर्यायी क्षेत्राचे गट क्र., नमुद केला नाही. तसेच सदर प्रस्तावित वनक्षेत्राची, पर्यायी क्षेत्राची केएमएल फाईल, मॅप सह (सीडीमध्ये) जोडली नाही.
७. प्रस्तावात जोडलेला शासन निर्णय, ग्रामसभेचा ठराव, ७/१२, इत्यादी मराठी भाषेतील कागदपत्रे ऑग्ल भाषेत Translate केलेले नाहीत. ते Translate करुन जोडावीत.
८. ग्रामसभेत हजर असलेल्या सदस्य व ग्रमस्थांची उपस्थितांची यादी जोडलेली नाही.
९. प्रस्तावात Idendified क्षेत्राची यादी समाविष्ठ केलेले नाही.
१०. प्रस्तावात व नकाशात वनेत्तर क्षेत्राचे ग. नं. त्यांचे क्षेत्र दर्शविणत आलेले नाही.
११. शासन निर्णयामध्ये ३२३ व्यक्तींसाठी रोजगार निर्माण होणार असल्याचे नमुद केले तर पार्ट १ मध्ये २४५ व्यक्तींसाठी रोजगार निर्मिती होणार असल्याचे नमुद आहे.

प्रस्तावित कामासाठी लागणा-या क्षेत्राची खात्री करुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह परिपुर्ण प्रस्ताव ऑनलाईन स्विकृती नंतरच विहीत प्रपत्रामध्ये या कार्यालयास ५ प्रतीमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

सोबत - मुळ ६ प्रस्ताव

(डॉ. भारत सिंह हाडा)
उपवनसंरक्षक,
सातारा वन विभाग, सातारा

प्रत - सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण), सातारा यांना माहितीसाठी.
प्रत - वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांना माहितीसाठी व नोंद घेणेकामी.

2/- आपलेकडील संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार असे कळविले आहे की सदर प्रस्तावित वनक्षेत्रात 187 वृक्षांची तोड करावी लागणार आहे. तरी सदर वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व तोड करावी लागणा-या वृक्षांची शास्त्रीय नावासह घेरी प्रमाणे यादी ७ दिवसात या कार्यालया सादर करावी. (आँग्ल भाषेत दोन्ही सादर करावे)

उप वन संरक्षक
वन विभाग सातारा